साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2566, भाद्रपद पौर्णिमा, 10 सप्टेंबर, २०२२ वर्ष 6 अंक 6

वार्षिक शुल्क रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


## धम्मवाणी

**वाचानुरक्खी मनसा सुसंवुतो, कायेन च नाकुसलं कयिरा।**

**एते तयो कम्मपथे विसोधये, आराधये मग्गमिसिप्पवेदितं॥**

*– धम्मपदपालि 281, मग्गवग्गो.*

– वाणीला संयमित ठेवावे, मनाला संयमित ठेवावे आणि शरीराने कोणतेही अकुशल (काम) न करावे. या तीनही कर्मपथां (कर्मेंद्रियां) चे विशोधन करावे. ऋषि (बुद्धा) ने सांगितलेल्या (अष्टांगिक) मार्गाचे अनुसरण करावे.

## बाबूभैयांना लिहिलेल्या पत्रांचे काही अंश

भारतातील शिबिरांविषयी सयाजी ऊ बा खिन यांना कळविण्याच्या हेतूने पूज्य गुरुजींनी बाबू भैया (मोठे भाऊ श्री बाबूलाल) यांना पन्नास वर्षांपूर्वी लिहिलेल्या खालील पत्रामधून हे स्पष्ट होते की त्या दिवसांत छोट्या-मोठ्या सर्व शिबिरांचे संचालन, कष्ट सहन करूनही पूज्य गुरुजींनी जितक्या समतेने केले, पारमी संपन्न साधकांचा सहयोगही तितकाच सहायक सिद्ध झाला. विपरीत परिस्थितींमध्येही शेवटी धर्माचाच विजय झाला, साधकांना अपूर्व लाभ मिळाला. बगहा (बिहार) च्या या शिबिरामध्ये काही तथ्ये समोर आली. इथे पूज्य गुरुजींनी गुरु-ऋणातून उऋण होण्याचा जो उपाय सुचविला, त्यांच्या 9व्या पुण्य-तिथी निमित्ताने आपणही त्याला अंगिकारण्याचा संकल्प करु आणि ज्या कोणत्याही प्रकारे धम्मदानाच्या पुण्य कार्यात योगदान देऊ शकतो, तसे करून अधिकाधिक लोकांना धर्मरस चाखवू शकण्यामध्ये सहायक होऊ, तेव्हाच खऱ्या अर्थाने गुरु-ऋणातून मुक्त होऊ शकू आणि तीच गुरुजींच्या प्रति खरी श्रद्धांजली ठरेल. – संपादक

## गुरु-ऋणातून उऋण होण्याचा उपाय

ठिकाण: बगहा (बोधगया, बिहार), 12 डिसेंबर, 1970

बाबूभैया, सादर प्रणाम!

तपश्चर्येसाठी निघालेले सिद्धार्थ गौतम, सम्यक संबोधि प्राप्त करण्यापूर्वी गयेच्या आस-पासच्या क्षेत्रांमध्ये विभिन्न ठिकाणी फिरलेच असतील. इथे या निर्जन वन प्रदेशात बोधगयेपासून 27 (जवळपास 43 किमी.) मैल दूर ज्या पाठशाळे (समन्वय विद्यापीठ, बगहा) मध्ये आमचे हे 23 वे शिबिर लागले आहे, त्याच्या आसपासही कधी ना कधीतरी त्या तपोनिष्ठ श्रमणाची पावले पडलीच असतील, अशी कल्पना सहजच केली जाऊ शकते. ही पण शक्यता आहे की सम्यक संबोधि प्राप्त केल्यानंतर धर्मचारिका करतानाही या क्षेत्रातून गेले असतील अथवा इथेच कुठेतरी विहार केला असेल. कदाचित हेच कारण आहे की इथल्या वायुमंडळामध्ये धर्म धातुंचे तरंग आजही प्रवाहमान आहेत. इथले धर्म शिबिर आज सायंकाळी अत्यंत सफलतापूर्वक संपन्न झाले आणि चित्त मोदाने प्रफुल्लित होऊन गेले. आपल्या या पुण्य मोदात सर्व प्राण्यांना सम्मिलित करताना मला पूज्य गुरुदेवांचे कृतज्ञतापूर्ण स्मरण झाले आणि ते सुखद स्मरण आत्तापर्यंत मनाला व्यापून राहिले आहे. त्यांना आपले सारे पुण्य समर्पित करताना मन वारंवार या भावनांनी भरून येत आहे:—

**जय जय जय गुरुदेवजू, जय जय कृपानिधान।**
**धरम रतन ऐसा दिया, हुआ परम कल्याण॥**

**रोम रोम किरतग हुआ, ऋण न चुकाया जाय।**
**दुखियन बांटूं धरम सुख, यह ही एक उपाय॥**

खरोखर त्यांच्या या महान ऋणातून मी कसा उऋण होऊ शकतो. मला त्यांच्याकडून जी धर्म विभूति मिळाली आहे, मी त्यामुळे किती धनवान झालो आहे, किती संपन्न झालो आहे. माझ्या धन ऐश्वर्याची कुठे काही सीमा राहिली नाही. कशा प्रकारे उन्मुक्त हस्ताने या अनमोल धर्म रत्नाची राशि-राशि दान करीत राहिलो आहे आणि तरीही संपन्नता घटण्याऐवजी वाढतच चालली आहे. ***–धम्मदानं सब्बदानं जिनाति।***

बर्मामध्ये राहत असताना शाळा, हॉस्पीटले, मंदिरे, धर्मशाळा, पुस्तकालये, वाचनालये इत्यादींकरीता जी धनराशी 'सर्वजनहितार्थ' लावली गेली, ती आमच्यासाठी कुशल फलदायिनीच असेल. परंतु या वेळी पूज्य गुरुदेवांच्या प्रतिनिधिच्या रूपात साऱ्या परिवारातर्फे मी या अपरिमित धर्मराशीचे जे दान संपादित करीत आहे त्याचा असीम सुखद परिणाम कोणत्याही मापदंडाने मोजला जाऊ शकत नाही. साऱ्या परिवाराचे हे अहोभाग्यच आहे. केवळ मीच नाही तर सारा परिवार पूज्य गुरुदेवांचा ऋणी आहे.

कोणी शिष्य गुरु-ऋणातून कसा मुक्त होऊ शकतो? 'मातृ-पितृ-गुरु' हे तीनही ऋण अपरिमित आहेत. यातून उऋण होणे सोपे नाही. माता-पित्याच्या ऋणातून उऋण होण्यासाठी तर भगवानांनी एक उपाय सांगितला की जर ते त्रिरत्न शरण नसतील तर, त्यांना त्रिरत्न शरणागत बनवावे. जर ते शील संपन्न नसतील, तर त्यांना शील संपन्न बनवावे. जर ते समाधी संपन्न नसतील, तर त्यांना समाधी संपन्न बनवावे. जर ते प्रज्ञा संपन्न नसतील, तर त्यांना प्रज्ञा संपन्न बनवावे. जर ते विमुक्ती रसाचा आस्वादन करू शकले नसतील, तर त्यांना विमुक्ती रसाचे आस्वादन करवावे आणि अशा प्रकारेच त्यांच्या ऋणांमधून मुक्त होऊ शकू. परंतु गुरु तर त्रिरत्न शरणही आहेत, शील संपन्नही आहेत, समाधी संपन्नही आहेत, याच्या व्यतिरिक्त प्रज्ञा संपन्नही आहेत, आणि

विमुक्ती संपन्नही आहेत तर त्यांच्यासाठी आणखी अधिक काय करावे, की त्यांच्या ऋणातून उतराई होता येऊ शकेल.

मला तर एकच उपाय दिसत आहे, ज्या बोधि-चित्ताने करुणा विगलित होऊन गुरु, लोकांच्या कल्याणाची कामना करतात आणि अधिकहून अधिक लोकांना धर्माच्या मार्गावर लावून त्यांचे मंगल साधतात, त्यांच्या या महान उद्देशाच्या पूर्तीमध्ये जर आपण आपला हातभार लावू आणि त्यांच्याकडून जो मंगल धर्म प्राप्त झाला आहे त्याला अधिकाधिक लोकांमध्ये वाटून त्याचे पुण्य-मोदन वर्धित करु तेव्हा आंशिक रूपाने त्यांच्या महान ऋणातून उऋण होऊ लागू. या दिशेने थोडेसे काम करून माझे मन स्वभावतःच धर्म प्रमोदाने लहरु लागते. आपल्या या पुण्य प्रमोदात तुमच्यासहित परिवारातील सर्व सदस्यांना सहभागी बनवितो तेव्हा स्वत:चे प्रमोद पुण्यच वाढवितो. मी या महान पुण्यात पूज्य गुरुदेव आणि माता सयामा यांच्यासहित तुम्हाला आणि साऱ्या परिवारालाच नाही, तर आश्रमाच्या समग्र साधक परिवाराला पुण्य वितरित करताना प्रसन्नतेने अभिभूत होत आहे.

बाहेर नीरभ्र आकाशात पौर्णिमेचा चंद्र प्रदीप्त होत आहे. स्वच्छ गगन पटलावर तारे खूप कमी दिसत आहेत. सर्वत्र चंद्राची ज्योत्स्नाच प्रफुल्लतेची उधळण करीत आहे. चहूकडील वातावरण पुलक रोमांचाने भरून गेले आहे. असे वाटत आहे की चारही दिशांमध्ये प्रकृतीच्या कणा-कणात मोद मुदिता भरून राहिली आहे. याचे जर व्यक्तीकरण केले तर असे म्हणता येईल की साऱ्या आकाशात देव मंडळी हर्ष विभोर झाली आहे. सर्वांच्या मनात धर्माच्या विजयाचा आनंद ओसंडून वाहत आहे. अशा स्थितीत कोणाचेही मन धर्म विभोर झाल्याशिवाय राहू शकत नाही.

हे शिबिर बोधगयेपासून 27 मैल (जवळपास 40 किमी.) दूर एका निर्जन वन प्रदेशात लागले आहे. चहुबाजूने निर्जन वनात सुमारे 70 एकर वनस्थळ कोण्या एका मठाच्या महंताने समन्वय आश्रमाचे प्रधान श्री द्वारको सुंदरानी यांना दान दिले होते जेणेकरून ते त्या जंगलाचे मंगल करत तिथल्या मागासलेल्या गरीब जातीच्या लोकांसाठी सेवेचा प्रबंध करु शकतील. या व्यक्तीने जवळजवळ 2 वर्षांपूर्वी या जमिनीत उगवलेल्या जंगली झाडा-झुडुपांना कापून जमीन साफ केली आणि तिथे छोटी-छोटी 2-3 घरे बनवून त्यात आसपासच्या 50 गांवांमधून दोन-दोन गरीब मुले घेऊन एक आश्रम आणि पाठशाळा स्थापित केली.

काही वर्षांपूर्वी बिहारमध्ये जो सतत 2 वर्षांपर्यंत भीषण दुष्काळ पडला होता त्या वेळी बोधगयेच्या समन्वय आश्रमाने खूप मोठ्या सेवेचे काम केले होते. विश्वभरातील भिन्न-भिन्न देशांच्या उदार व्यक्तींनी आणि संस्थांनी या आश्रमाला पीडितांच्या सेवेसाठी मोठ्या प्रमाणात धनराशी आणि सामग्री पाठवली. बाहेरच्या लोकांनी पाहिले ही एक अशी संस्था होती की ज्याच्या अधिकांश निःस्वार्थ कार्यकर्त्यांनी आदर्श सेवा केली आणि केवळ यांची सेवा-पद्धत पाहण्यासाठी अनेक विदेशी इथे येऊ लागले. अशा प्रकारे बोधगयेचा समन्वय आश्रम अनेक विदेशींच्या तीर्थ स्थानासारखा बनला आणि तेव्हापासून आत्तापर्यंत प्रत्येक वर्षी शेकडोंच्या संख्येने सेवा-भावी विदेशी इथे येतच असतात. त्यापैकी अनेकजण इथे राहून काही दिवसांपर्यंत, काही महिन्यांपर्यंत आपले श्रमदान करीत असतात. अनेक विदेशी संस्था आपल्या तरुण स्वयं-सेवकांना प्रशिक्षणासाठी इथे पाठवित असतात. ज्या अनेक विदेशींचे इथे आगमन होते, त्यामधील काही इथली गरीबी पाहून आणि या गरीबांची होत असलेली सेवा पाहून आपल्याकडून यथाशक्ती आर्थिक सहायताही करीत असतात. तसे या निर्जन जंगलात ही पाठशाळा स्थापित करण्यामध्ये श्री द्वारकोजींना कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचण आली नाही. पण केवळ पैशानेच सर्व कामे होत नाहीत. निःस्वार्थ सेवाभावी व्यक्तींमुळेच अशा संस्थांचे काम पुढे चालू राहते. जिथे सत्याने काम होते तिथे आर्थिक सहायता हात बांधून मागे-मागे येऊ लागतेच.

हो! तर मी म्हणत होतो की बगहा नावाच्या अरण्यस्थळाची ही पाठशाळा जिथे एकीकडे विदेशींकडून मिळालेल्या आर्थिक सहायतेने निर्मित झाली, तिथे दुसरीकडे समन्वय आश्रमाच्या कर्मठ कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थ सेवेनेही झाली, उलट पहिल्यापेक्षा दुसऱ्यालाच अधिक महत्व मिळायला पाहिजे. ज्या महंताने हा निर्जन जंगलाचा तुकड़ा द्वारकोजींना दान दिला त्यांच्यासाठी या जमिनीचा वार्षिक राज्य कर भरणेही भारी पडत होते, कारण यापासून त्यांना कोणतेही उत्पन्न मिळत नव्हते. ते म्हणतात की जर पैशांनीच सर्व काही झाले असते तर द्वारकोजींना जी विदेशींकडून सहायता मिळाली त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक रक्कम माझ्या कोषागारामध्ये आहे. परंतु मी या निर्जन अरण्याला वसवू शकलो नाही आणि ना तर कधी वसवू शकत होतो. या म्हणण्यात पूर्ण सत्यता आहे.

आज ही 70 एकर जमीन काट-छाट करून साफ केली गेली आहे. जवळपास अर्ध्या हिश्श्यात शेती सळसळू लागली आहे. फळांची अनेक झाडे लावली गेलीत की जी काही वर्षातच फळे देऊ लागतील. पाण्यासाठी मोठ-मोठे जलाशय आणि विहिरी खोदल्या गेल्या, ज्यामुळे शेतीचे काम चालते. एक खोल ट्यूबवेल बसविण्याचा प्रबंध होत आहे. एक आदर्श गोशाळा स्थापित केली आहे. पण या सर्वाहून अधिक श्रेष्ठ मुलांचे हे आश्रम अरण्य निवास स्थान आहे, ज्यामध्ये आसपासच्या क्षेत्रातून एक-एका गावाच्या प्रतिनिधिंच्या रूपात दोन-दोन मुले घेऊन त्यांचे पालन केले जात आहे. या उद्देशाने की मोठे होऊन ही मुले आपल्या गावी परतून स्वत: आदर्श जीवन जगू शकतील आणि आप-आपल्या ग्रामवासींना सफल मार्ग निर्देशन करु शकतील. या स्वप्नांच्या सफलीभूत होण्याच्या शक्यतेची पूर्ण खात्री आहे.

जवळजवळ सर्वच्या सर्व मुले-मुली समाजाच्या निम्न स्तरातील परिवारांमधून घेतली गेली आहेत, यामधून अधिकांश असे आहेत, ज्यांच्या घरांमध्ये वर्षातील 4-6 महिन्यांपर्यंत अन्नाचे दर्शनही होत नाही, केवळ जंगलातील झाडांची पाने खाऊन दिवस काढावे लागतात. या म्हणण्यात कुठेही कोणती अतिशयोक्ती नाही. हा भारताचा सर्वात गरीब भाग आहे आणि आता ही मुले या आश्रमात जे जीवन जगत आहेत ते त्यांच्यासाठी पूर्णपणे नवीन आहे. दिवसभरात केवळ 2 तास अभ्यास असतो, बाकीचा सर्व वेळ मुले काही ना काही काम करत असतात. काम करणे हेच विद्या अध्ययनाचे प्रमुख अंग आहे.

हे भारताचे खूप मोठे दुर्भाग्य राहिले आहे की इथली शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना काम करण्यापासून दूर ठेवते. श्रमाला हीन समजले जाऊ लागले आहे, गुण नाही. तेव्हाच तर घरात वीजप्रवाह बिघडला तर घरातील मुलगा जो कॉलेजमधून इलेक्ट्रिकल इंजीनियर होऊन आला आहे, स्वत: वीजप्रवाह सुधारु शकत नाही, भले त्याने यावर एक शोध पत्रही लिहिले असेल. मी कधी-कधी विचार करीत असे की आपल्या समाजात हे जे दूषण आले आहे, याचे कारण विदेशी हुकूमता असेल. परंतु आता मागच्या दीड वर्षात एक गोष्ट ही लक्षात आली की हे तर देशाचे राष्ट्रीय दूषण आहे. इथे नेहमी सैद्धांतिक पक्षालाच सारे महत्व दिले जात राहिले आणि व्यावहारिक पक्षाला शून्य ठेवण्याचीच सवय लागून गेली. जरी या देशात तत्वज्ञानाला दर्शन म्हटले गेले, ज्याचा अर्थ आहे साक्षात्कार करणे. परंतु वस्तुतः स्वानुभूतिद्वारे साक्षात्कार करण्याऐवजी सारे दर्शन सैद्धांतिक सूक्ष्मतांमध्येच अडकून पडले.

गीतेच्या स्थितप्रज्ञतेवर आणि अनासक्तीवर आजपर्यंत न जाणे कितीतरी व्याख्या आणि टीका झाल्या असतील. आपल्या या उच्च सिद्धांतांमुळेच हा जगातील बहुचर्चित ग्रंथ राहिला आहे. परंतु व्यावहारिक दृष्टीकोनातून कशा प्रकारे स्थितप्रज्ञ आणि अनासक्त बनता येऊ शकेल याच्या अभ्यासाची

कोणाला काही चिंता वाटली नाही. खूप झाले तर ईश्वरी कृपेकडे डोळे लावून बसले. आजही माझी वादावादी अशाच अनेक लोकांशी होत असते जे केवळ हे जाणू इच्छितात—मी काय शिकवतो? माझा काय सिद्धांत आहे? बस्स हे जाणले तर समजले की आम्हाला विषयाचे ज्ञान झाले आणि ज्याला ज्ञान झाले, त्याला मुक्ती मिळाली. खूप अजीब परिभाषा केली गेली आहे ज्ञानाची. ते ज्ञान आपल्या जीवनात उतरले आहे की नाही, याची कोणाला चिंता नाही, पण त्याची माहिती प्राप्त झाली तर असे समजतात- उद्देश पूर्ण झाला. अभिप्राय हा आहे की जवळजवळ सर्व क्षेत्रांमध्ये व्यावहारिक पक्ष शून्य राहिला आणि सैद्धांतिक पक्ष प्रबळ झाला. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा अर्थ झाला, फक्त माहिती करून घेणे, काही करणे नाही. या मनोवृत्तीच्या विपरीत हे जे काही करण्याचे शिक्षण दिले जात आहे, खरोखरच प्रशंसनीय आहे, कारण हेच उपयोगाचे आहे.

## समन्वय विद्यापीठाच्या साधकांची प्रगती

द्वारको भाईंच्या मनात आले की या मुलांचा पाया अध्यात्मपूरक असावा, त्याकरीता त्यांना लहानपणापासूनच अध्यात्माचे पायाभूत शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. परंतु हे शिक्षणही केवळ सैद्धांतिक न होता व्यावहारिक व्हावे, याच उद्देशाने इथे शिबिर लावण्याचा त्यांचा आग्रह होता. कोण-कोणत्या शिबिरात दोन-चार मुले घेतली जातात तेव्हा त्यांच्यामुळे सर्व साधकांना अडचणीचेच होत असते, याचा अनुभव मी घेतला आहे. म्हणूनच 10-10 वर्षांच्या— 25 मुलांना धर्म शिकवण्याचे काम खरोखरच मला खूप कठीण वाटले. मी देखील केवळ मात्र एका नवीन अनुभवाच्या आणि अनुसंधानाच्या दृष्टीकोनातूनच या कार्यक्रमासाठी तयार झालो आणि यातून गेल्यावर पाहिले की हा खरोखरच माझ्यासाठी एक नवीनच अनुभव होता. सर्व मुले माकडांसारखीच असतात तेव्हा त्यांच्याकडून आणखी काय अपेक्षा केली जाऊ शकते. शांत स्थिर बसू शकणे या मुलांच्या स्वभावाविरुद्ध होते. चित्त एकाग्र करण्याचा अभ्यास करणे तर खूप दूरची गोष्ट आहे. जर कधी पूर्ण अथवा अर्ध्या दिवसासाठी मौन व्रत दिले जायचे तेव्हा मी पाहत होतो की त्यांचे सारे शरीर वाचाळ होऊन जायचे. दिल्लीच्या शिबिरातील एका भिक्षूने म्हटले होते की आपण शिबिरात इतक्या साधकांशी अविरतपणे संघर्ष करीत असता, तरीही कधी चिडत नाही, हा तर खरोखर धर्माचाच स्वभाव आहे.

विदेशींनीही हेच म्हटले की आम्ही आपल्या शिबिरांमध्ये वारंवार याकरीता बसतो की आम्हालाही आपल्यासारख्या शांतीचा एखादा अंश प्राप्त व्हावा. परंतु इथे येऊन मी पाहिले की ही मुले माझ्या शांतीची आणि सहिष्णुतेची कडक परीक्षा घेतील आणि खरोखरच मला वाटले की माझ्यासाठी हे शिबिर एक प्रशिक्षण शिबिरच आहे. मुलांच्या दंगा करण्याने अथवा अनुशासन हीनतेमुळे अनेक वेळा उद्विग्नता आली, परंतु प्रत्येक वेळी मन सचेत आणि जागृत राहिले त्यामुळे ती उद्विग्नता अत्यंत अल्पकाळ राहिली. फक्त एकदा एका मुलाला आणि दुसऱ्या वेळी दोन मुलांना खूप बोलत असल्यामुळे समूहातून हटवून एका बाजूला भिंतीकडे तोंड करून उभे राहण्याचा दंड द्यावा लागला. परंतु त्या वेळीही मी वारंवार हे तपासत होतो की मनात त्यांच्या विषयी करुणा-जन्य भाव आहे की नाही. कदाचित याचाच प्रभाव होता की इतका दंगा करणारी मुले पाचव्या दिवशी विपश्यना घेऊ शकले आणि प्रत्येकाच्या शरीरात चैतन्य जागले आणि सर्वच्या सर्व एक-एक तासाचे अधिष्ठान मोठ्या सरलतेने करू लागले. कोणा-कोणा मुलाला एक-दोन वेळा भले साधारण हलावे लागले असेल. मुलांची ही प्रगती पाहून जे 11 जण प्रौढ होते त्यांना आश्चर्य वाटले आणि प्रेरणाही प्राप्त झाली. मुलांप्रमाणेच मोठ्यांनाही आश्चर्यजनक सफलता मिळाली. केवळ एका 75 वर्षीय जर्मन वृद्धेला सोडून, बाकी सर्वच्या सर्व भवंगच्या सूक्ष्म अवस्थेपर्यंत पोहोचले.

भिक्षू महेंद्र दिल्लीनंतर व्हिएतनामी भिक्षूबरोबर इथे बोधगयेला आले आणि द्वारकोजींसोबत त्यांची ही वनस्थळीवाली पाठशाळा पाहायला गेले तर जोपर्यंत शिबिर लागत नाही तोपर्यंत तिथेच राहण्याचा आग्रह करु लागले. द्वारकोजींनी हा निर्णय घेतला होता की पाठशाळेच्या शिबिरात बाहेरच्या कोणा व्यक्तीला घेतले जाणार नाही. परंतु यांच्यासाठी अनुमती दिली आणि म्हणून हे भिक्षूही तिथल्या शिबिरात बसू शकले. या शिबिराने त्यांना बराच लाभ झाला. आठव्या-नवव्या दिवशी जेंव्हा अपूर्व शांति मिळाली तेव्हा बोलू लागले, “खरोखर आता 25 वर्षांच्या भिक्षू जीवनाचे श्रामण्य फळ प्राप्त झाले”. यांच्या मनात पूज्य गुरुदेवांप्रति खूप मोठी श्रद्धा आहे आणि वारंवार मला आठवण करून देत राहतात की मी जेव्हाही कधी पत्र लिहिन, पूज्य गुरुदेवांना यांचे स्मरण अवश्य करून देईन, जेणेकरून त्यांच्या विशेष मैत्री भावनेचा लाभ प्राप्त करु शकतील.

इथे काही अन्य प्रौढ साधक सम्मिलित झाले, ज्यामध्ये एक तिथली महिला अध्यापिका होती, बाकी सर्व पुरुष. पुरुषांमध्ये प्रमुख भाई श्री द्वारकोजीच आहेत की जे महात्मा गांधींच्या विचारांच्या अनुकूल त्यांच्या मृत्युनंतर श्री विनोबा भावे यांच्या द्वारे आरंभ केलेल्या सर्वोदय समाजाचे अखिल भारतीय स्तराचे महामंत्री आहेत आणि बोधगयेच्या समन्वय आश्रमाचे व्यवस्थापक आहेत. भारतातील सर्वोदयवादी कार्यकर्त्यांमध्ये यांचे प्रमुख स्थान आहे.

मागच्या वेळी बोधगयेमध्ये जे शिबिर लागू शकले ते यांच्याच उत्साहपूर्ण सहयोगामुळे लागले. त्यामध्ये यांच्या आश्रमातील तीन सहकारी कार्यकर्त्यांनी भाग घेतला होता आणि अत्यंत संतुष्ट झाले होते. ते स्वत:ही मागील काही महिन्यांपासून एखाद्या शिबिरात भाग घेण्यासाठी उत्सुक होते परंतु काही ना काही अडचणींमुळे बसू शकले नव्हते. या वेळी आपल्याच पाठशाळेमध्ये सम्मिलित होऊ शकले. मी आपल्या मागच्या अनुभवांच्या आधारे पाहिले आहे की जेव्हा कोणी व्यक्ती आपल्याच ठिकाणी शिबिर लावून स्वत: त्यात सम्मिलित होतो तेव्हा त्याची प्रगती खूप मंद होते. कारण एक तर त्याचे थोडे फार तरी लक्ष शिबिराच्या व्यवस्थेकडे जातच असते आणि दुसरे तिथल्या वातावरणात तो अशा रीतीने सम्मिश्रित झालेला असतो की अचेतन मनाला तिथल्या हजार गोष्टी नकळतपणे ओढतच राहतात. साधनेसाठी 10 दिवसांचे गृह निष्क्रमण अनिवार्यच आहे. या व्यक्तीलाही आपल्या घरी शिबिर लागल्यामुळे अडचणी आल्या. परंतु मला स्वत:ला हे पाहून आश्चर्य वाटले की कशा पद्धतीने लडखडत असतानाही हा व्यक्ती नवव्या दिवशी भवंग स्थितीला जाऊन पोहोचला आणि धर्म गंगेमध्ये खोलवर डुबकी लावू लागला. याच प्रमाणे अन्य सर्व व्यक्तींनीही कमीअधिक भवंगची स्थिती प्राप्त केली. हो! एक मुस्लिम मुलगा सम्मिलित झाला होता ज्याला मी प्रौढांमध्ये मोजले होते. परंतु तो केवळ 15-16 वर्षांचा किशोर होता आणि अधिकतर मुलांच्या मध्येच राहत होता. त्यालाही मुलांसारखे उदय-व्ययचेच ज्ञान झाले.

त्या साधकांमध्ये सर्वात वेगवान श्री सीतारामदास नावाचे एक अध्यापक निघाले, जे की मुलांना आसन प्राणायाम इत्यादी शिकवतात आणि आश्रमाचे प्राकृतिक चिकित्सकही आहेत.

सर्वांना या शिबिराच्या सफलतेने खूप आनंद झाला. द्वारकोजी यांनी यामध्ये आपल्या आणि आपल्या संस्थेच्या उद्देशांची आधारशिलाही मिळवली आणि चरम परिणती देखील. यामुळे त्यांनी आग्रह केला की सर्वोदय समाजाच्या आश्रमांमध्ये मी ठिक-ठिकाणी अवश्य शिबिर लावावे, ज्यामुळे या क्षेत्रात कार्य करणारे जे निःस्वार्थी कार्यकर्ते आहेत, त्यांची आध्यात्मिक तहान भागेल आणि लोक-कल्याण्याच्या आपल्या पावन लक्ष्यात त्यांना नैतिक बळ प्राप्त होईल. मला या वेळी इंदौर, जयपुर आणि वर्धाच्या सर्वोदय समाजाकडून

शिबिर लावण्यासाठी साग्रह आमंत्रण आहे, या व्यतिरिक्त द्वारको भाईंचा आग्रह आहे की सर्वोदय आंदोलनवाल्यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांचे एक शिबिर मे महिन्यात उत्तर काशीमध्ये लावावे. त्याचबरोबर बुद्ध जयंतीच्या निमित्ताने बैंगलोरमध्ये होणाऱ्या त्यांच्या वार्षिक अधिवेशनात सम्मिलित व्हावे आणि तिथे धर्म प्रवचनाचा कार्यक्रम ठेवला जावा. मला ही प्रवचनांवाली गोष्ट फारशी रुचत नाही. तरी यातून नव्या साधकांमध्ये प्रेरणा अवश्य जागते. परंतु कधी वेळ मिळाला तर या सर्वोदय-वादीं (सर्वोदयी लोकां) साठी शिबिर लावण्याची गोष्ट अवश्य पटते. कारण याने सद्धर्माद्वारे लोक कल्याणाचे एक नवे क्षेत्र उघडेल. परंतु लांबच्या भविष्याच्या दीर्घसूत्रीय योजनांमध्ये लक्ष देण्याऐवजी वर्तमानावर अधिक जोर दिला आणि ज्या शिबिरांचे कार्यक्रम या वेळी डोक्यावर आहेत त्यांचे चांगल्या प्रकारे संचालन करण्याचे बळ संग्रहीत करु शकलो तर चांगलेच आहे. पूज्य गुरुदेव आणि माता सयामांचे धर्म-बळ माझ्यासाठी अपूर्व शिदोरीचे काम करीत आहे. इथे जे काही होत आहे ते निश्चितच माझ्या क्षमतेबाहेरचे आहे. पूज्य गुरुदेवांचे आणि त्यांच्या परंपरेतील पूज्य सया तैजी आणि लेडी सयाडोपासून महाकारुणिक भगवान बुद्धांपर्यंतच्या सर्व आचार्यांचे सम्मिलित धर्म-बळ या धर्म गंगेला भारतात पुन्हा प्रवाहमान करण्यामध्ये सहायक सिद्ध होत आहे. बगहा अरण्य स्थळी मध्ये लागलेल्या या शिबिरात मला धर्माच्या विशाल वटवृक्षाचे बीज अंकुरीत होताना दिसत आहे. भारतात येताच मी जागोजागी हेच व्रत अंगिकारले की मी भारतात बौद्धांची संख्या वाढविण्यासाठी आलो नाही आणि ना ही माझे असे काही मिशन आहे. माझी एक मात्र मनोकामना हीच आहे की लोकांनी शील, समाधी आणि प्रज्ञेच्या या पावन मार्गाचे अनुसरण करणे शिकावे आणि त्यानंतर आपल्या स्वत:ला सनातनी, आर्य समाजी, शीख, जैन, मुस्लिम, इसाई इत्यादी काहीही म्हणावे. सारे भारतवर्ष आपल्या स्वत:ला बौद्ध म्हणू लागले आणि त्यातील एकही निवासी शील, समाधी आणि प्रज्ञावान नसेल तर ही दुर्भाग्याचीच गोष्ट होईल, परंतु भारतवर्षात बौद्ध म्हणणारा एकही व्यक्ती नसेल आणि तरीही देशातील सारे निवासी शील, समाधी आणि प्रज्ञावान असतील तर ही सौभाग्याचीच गोष्ट होईल आणि हीच माझ्या ध्येयाची सफलतम परिणती होईल. माझे हे विचार आणि या विचारांच्या अनुरूप केले जाणारे काम, या सर्वोदयवादींच्या विचारधारेशी खूप मिळते-जुळते आहे. पाहू यांचे वरिष्ठ लोक याचा कशा प्रकारे अंगीकार करतात ते.

तुमचा अनुज,
सत्य नारायण गोयन्का

**नवे उत्तरदायित्व**
**वरिष्ठ सहायक आचार्य**

1. श्रीमती शशि अग्रवाल, इगतपुरी
2. श्रीमती जयश्री भूयान, कटक
3. श्री श्रीनिबास स्वैन, भुवनेश्वर
4. श्रीमती समिता स्वैन, भुवनेश्वर
5. श्री अमित सक्सेना, पुणे
6. श्रीमती प्रीति धांडे, पुणे
7. श्री मनीष मिनेयार, पुणे
8. श्री तेजस नीलकंठ पाटिल, पुणे
9. श्री वीरभद्र शंकर स्वामी, पुणे
10. श्रीमती महानंदा संतोष हिंगे, पुणे
11. श्रीमती ललिता प्र. बनसोडे, भुसावळ
12. श्री प्रकाश सुरेश बनसोडे, भुसावळ
13. सुश्री निर्मला उत्तम सोनवणे, भुसावळ
14. श्रीमती संगीता अ. अदकमोल, भुसावळ

**नव नियुक्ती**
**सहायक आचार्य**

1. श्री अनंत नाइक, पालघर
2. श्री कृष्णन कन्नन, आणि
3. श्रीमती लक्ष्मी के. कन्नन, चेन्नई
4. श्री गजेंद्र शर्मा, बड़ोदरा
5. श्री प्रदीप वाघमारे, पुणे

**बालशिविर शिक्षक**

1. श्री उमेशचंद्र भूयान, कटक, उड़ीसा

## दोहे धर्माचे

भाग्याने रे मुक्तीचा, मिळे च पंथ महान।
भव भय व्याकुळ जीवाचे, झाले परम कल्याण॥

मातीचे पुतळे सगळे, मिळती च राखेला।
येई धर्मच बरोबर, पुण्य लोक सुखाला॥

धर्म जागे, सुख जागे, दुःख च उखडत जाय।
मिटे तडफड तृष्णेची, तृप्ती रस रे पाय॥

प्रज्ञा शील समाधी च, शुद्ध धर्माचे सार।
काया वाणी चित्ताचे, सुधरती व्यवहार॥

## दूहा धरम रा

सुख पसरे च संसारी, दुःखी नसे रे कोय।
जन जन मन जागे धर्म, जन जन सुखी च होय॥

दुःखी जनांचे दुःख मिटे, भय त्यागे भयभीत।
वैर सोडूनी सर्व जन, करी परस्पर प्रीत॥

अज्ञानाचा अंधकार, पसरे जनी बहुत।
जागे रे सद्धर्माची, विमल ज्ञानाची ज्योत।

धर्म-धरतीवर वाहे, शुद्ध धर्माची धार।
पुन्हा एकदा रे होवो, सकळ जगत उद्धार॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनीः (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2566, भाद्रपद पौर्णिमा, 10 सप्टेंबर 2022

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/286/2021-2023

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 16 August, 2022 DATE OF PUBLICATION: 10 September, 2022**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी, इगतपुरी - 422 403**
**जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन : (02553) 244076, 244086,**
**244144, 244440.**
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org